दि. २९ नोव्हेंबर २०२३

प्रति,
अनुराधा वजीरे मॅडम,
स्टेशन मॅनेजर,
एफ टि आय आय, पुणे

**विषय : माझे सामाजिक कार्य समुदायापर्यंत पोहचण्यासाठी रेडियो कार्यक्रम करणे.**

नमस्कार महोदया,

मी इरफान शफिक पठाण, राहणार पुणे दिव्यांग असल्यामुळे वयाच्या १५ वर्षेपर्यंत घरीच राहिलो. नंतर मावळ तालुक्यातील अपंगासाठी चालविल्या जाणाऱ्या वसतीगृहात प्रवेश घेतला आणि वयाच्या १५व्या वर्षी शिक्षणाला सुरुवात झाली.
१ली ते डिप्लोमाचे शिक्षण पूर्ण केले. त्यानंतर G.D. Art (Government Diploma in Art) २०१६ मध्ये पूर्ण केले. कॉलेज करीत असतांना कमवा आणि शिका याच्या साहाय्याने पार्ट टाईम ग्राफिक्स डिझाईनचा जॉब करून डिप्लोमा पण पूर्ण केला.
मला महाविद्यालयीन शिक्षण पूर्ण करण्यासाठी Make My Dream Foundation  या संस्थेने खूप मोलाचे सहकार्य केले आणि त्यांमुळे मी जीवनाचा एक महत्त्वाचा आणि मोठा टप्पा पूर्ण करू शकलो.

**माझे काही महत्त्वाचे आवड-निवड खालील प्रमाणे आहेत –**
१) मला शास्त्रीय संगीताची आवड असल्या कारणाने मी (उपात्य विशारद) हार्मोनियम वादन परिक्षा पास केली.
२) मला नाटकाची पण खूप आवड आहे. नाटकाच्या प्रयोगासाठी मी पुणे, मुंबई, उदयपूर (राजस्थान) अशा ठिकाणे फिरलो आहे.
३) चित्रकलेची आवड तर मला जीवन जगण्याचे सार शिकवून गेले. चित्रकलेत मी ५ वर्षाचा G.D. Art Diploma केला.

**नोकरी :**
कॉलेज पूर्ण केल्यावर खराडी येथे आय.टी पार्क मध्य काही काळ ग्राफिक्स डिझायनर म्हणून काम केले. नंतर कागदी पिशव्या बनविण्याची कंपनी सुरु केली. आणि त्या कपंनीत सर्व दिव्यांग बंधूंना कामावर ठेवले. ३ वर्षे कंपनी छानपैकी चालू होती. पण कोव्हिडच्या काळात सगळे काम मिळणे बंद झाली आणि कंपनी बंद करावी लागली.
पण काहीही करण्याची जिद्द आणि चिकाटी होती. त्यामुळे संगीताचे आणि चित्रकलेचे क्लासेस चालू केले आणि अश्या तऱ्हेने स्वत:च्या पायावर उभा राहून परत जीवनाचा प्रवाह सुरु केला.
दरम्यान स्वत:ची रिक्षा घेतली आणि प्रवासांचे वाहतूक सुरु केले.

**सामाजिक कार्य :**
माझ्या सगळ्या प्रवासाला समाजाची खूप मोलाची मदत मिळाली. त्यामुळे आपण पण समाजाचे काही देणे लागतो, म्हणून सुनिल साहू सरांच्या मदतीने मा सारदा फाऊंडेशन या सामाजिक संस्थेच्या

माध्यमातून वेगवेवेगळे सामाजिक उपक्रमात भाग घेण्यास सुरु केले. या सगळ्या प्रवासात एक गोष्ट प्रकर्षाने जाणविले कि आपला दु:खाचा डोंगर मोठा वाटू लागला कि बाहेच्या लोकांचे दु:ख बघून आपला दु:ख काहीच नाही ही जाणीव होती.

**काही महत्त्वाचे उपलब्धी :**

१) गायन, वादन, नाटक या तिन्ही प्रकारात खूपसे प्रमाणपत्र मिळाले आहेत.

२) Skill India Competition साठी दिल्लीमध्ये भरविण्यात आलेल्या स्पर्धेत भाग घेतला आणि दुसरा क्रमांक मिळविला.

३) २०१४ साली सिहंगड ट्रेक पूर्ण केला (मेक माय ड्रीम फाऊंडेशनच्या मेघा कुलकर्णी मॅड्मच्या मार्गदर्शनाखाली)

**सामाजिक बांधिलकी :**

माझे सगळे यश आणि जीवन समाजाच्या आशिर्वादाने भरलेले आहे. त्यामुळे आयुष्यभर जमेल तसे आणि जमेल तिथे सामाजिक कार्यत सहभागी होत राहीन.

तरी आपण मला रेडियो एफ टि आय आय च्या स्टेशन वर मुलाखत देण्यासाठी परवानगी देण्यात यावी हिच नम्र विनंती.

धन्यवाद

कळावे,

आपला

इरफान पठाण

मो. 8459615317